32

दि. १४/०७/२०२३

**प्रसिध्दी पत्रक**

आरोपी लोकसेवक :- श्री अशफाक मुस्ताक शेख, वय ३७ वर्ष, पद- पोलीस उप निरीक्षक, नेमणुक- पोलीस ठाणे जिन्सी यांनी तक्रारदार यांचेकडून रुपये 1,००,०००/- स्विकारल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबादच्या जाळ्यात.

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | :- | औरंगाबाद |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे सिटीचौक, औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे. |
| आ.लो.से. यांचे नाव हुद्दा व पत्ता | :- | श्री अशफाक मुस्ताक शेख, वय ३७ वर्ष, पद- पोलीस उप निरीक्षक, नेमणुक- पोलीस ठाणे जिन्सी वर्ग-३ |
| लाच मागणी रक्कम | :- | 1,००,०००/- रुपये. |
| लाच स्विकृती रक्कम | :- | 1,००,०००/- |
| तपास अधिकारी | :- | श्री. नंदकिशोर क्षीरसागर, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद. |
| लाच मागण्याचा हेतु | :- | दाखल गुन्हयात साक्षीदार याला आरोपी न करण्यासाठी. |
| थोडक्यात माहिती | :- | यातील तक्रारदार यांचेकडे पोलीस ठाणे जिन्सी येथील दाखल गुन्हयात साक्षीदार याला आरोपी न करण्यासाठी 1,००,०००/- रुपयांची आ.लो.से. श्री. अशफाक शेख यांनी लाचेची मागणी करित असल्याने, तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद या कार्यालयात तक्रार दिली.<br>त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,औरंगाबाद तर्फे आज दि. 14/07/2023 रोजी सापळा आयोजीत केला असता, आ.लो.से. श्री. अशफाक शेख यांनी तडजोडीअंती 1,00,000/- रुपये मागणी करुन पंच साक्षीदारा समक्ष तक्रारदार यांचेकडून शहागंज गांधीभवन जवळ रोडवर लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर लाचेच्या रक्कमेसह त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुद्ध पो.स्टे. सिटीचौक औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मा.संदिप आटोळे, अपर पोलीस अधीक्षक मा. विशाल खांबे, पोलीस उप अधिक्षक राजीव तळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक, नंदकुमार क्षीरसागर यांनी केली आहे. त्यांना सदर कारवाई कामी पो.अं. अशोक नागरगोजे, शिरीष वाघ, राजेंद्र सिनकर, चालक सी.एन.बागुल यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद
ई- मेल :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,
पोलीस अधीक्षक :- 9923023361 अपर पोलीस अधीक्षक :- 8788644994
पोलीस उप अधीक्षक :- 9823498777

पोलीस उप अधीक्षक कार्यालय, ॲन्टी करप्शन ब्युरो औरंगाबाद
सत्यमेव जयते

( राजीव तळेकर )
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
औरंगाबाद.